③

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दिनांक १८/१/२००४ रोजी दुपारी ३.०० वाजता झालेल्या १३३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

सदर बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. आमदार श्री. के.बी. नागरे | सभापती, |
| २. मा. श्री.के.बी. गवळी | मुख्य अधिकारी तथा उपसभापती |
| ३. मा. श्री. राजेश्वर चव्हाण | सदस्य |
| ४. मा. ॲड. श्री. जे.पी. पाटील | सदस्य |
| ५. मा. श्री. विश्वास उपासे | सदस्य |
| ६.मा. श्री चॉंदपाशा इनामदार | सदस्य |

बैठकीचे कामकाज सुरु होण्यापुर्वी मा. मुख्याधिकारी यांनी मा. सदस्यांना माहिती दिली की, निलंगा येथील भूमीपुजनाचा कार्यक्रम मा.ना.श्री. शिवजीराव पाटील निलंगेकर यांच्या शूभहस्ते आज दिनांक १८/१/२००४रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झाला. त्यानंतर मंडळाच्या पटलावरील विषयानुसार बैठकीच्या कामकाजास सुरुवात झाली.

विषय क्र. १ : दिनांक १६/१२/२००३ रोजी झालेल्या मंडळाच्या १३२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

दिनांक १६/१२/२००३ रोजी झालेल्या मंडळाच्या १३२ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांता विषयी सविस्तर माहिती मुख्य अधिकारी यांनी मंडळास दिली. मंडळाने यावर सांगोपांग चर्चा करुन बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते मान्य केला व निर्णय घेतला की,

ठराव क्र. ७८९

दिनांक १६/१२२००३ रोजी झालेल्या मंडळाच्या १३३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत उपरोक्त चर्चेसह कायम करण्यांत आला.

विषय क्र. २ : सन २००३ - २००४ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २००४ - २००५ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक .

या विषयाच्या बाब टिप्पणीबाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, सन २००३ - २००४ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २००४ - २००५ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यामध्ये मंडळाच्या ताब्यात येणाऱ्या जमिनी व ताब्यात असलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत तरतुद करण्यांत आलेली आहे. तसेच प्राधिकरणाच्या नियमावलीनुसार औरंगाबाद मंडळाचा सन २००३-२००४ चे सुधारीत व सन २००४-२००५ चा प्रस्तावित बांधकाम कार्यक्रमाचे, राष्ट्रीय झोपडपटटी सुधारणा कार्यक्रम, वाल्मिकी आंबेडकर आवास योजना, लोक आवास योजना इत्यादी योजनांचे आर्थिक व भौतिक उद्दिष्टे मंडळाच्या निदर्शनास आणून देण्यांत आले.

यावर मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, बाब टिप्पणीत नमुद केलेली अंदाजपत्रके वस्तुस्थितीशी निगडीत असुन मान्य करण्यास हरकत नाही. यावर उपस्थित सर्व मा. सदस्यांनी सहमती दर्शविली व सर्वानुमते निर्णय घेतला की,

ठराव क्र. ७९०

सन २००३ - २००४ चे बाब टिप्पणीत नमुद केल्याप्रमणे सुधारीत अंदाजपत्रक व सन २००४ - २००५ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने त्यास मान्यता प्रदान केली व स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्याचे ठरले.

विषय क्र. ३. : राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत औरंगाबाद येथील घोषित झोपडपट्टीतील कामांच्या प्रस्तावास (नारेगांव व स्टेशन हमालवाडा) प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

या विषयाबाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेने नारेगांव व स्टेशन हमालवाडा या घोषित झोपडपट्टयांमधील १९९१ ची लोकसंख्या (मा. आयुक्त औरंगाबाद महानगरपालिका यांनी प्रमाणीत केलेल्या) विचारात घेऊन (बाब टिप्पणीत नमुद केल्याप्रमाणे व त्यासोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे) उपरोक्त मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी जसे की, सार्वजनिक शौचालय व रस्ते बांधण्यासाठी एकुण रु. १७,१७,३५१/- एवढया रक्कमेचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी मंडळाकडे सादर केलेले आहे. मुख्य अधिकारी यांनी अशीही माहिती दिली की, मुलभूत सुविधा अंतर्गत विषयांकीत प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार मंडळास असल्याने बाब टिप्पणी विचारार्थ व निर्णयास्तव मंडळासमोर सादर केली आहे.

याबाबत मंडळाने सर्वानुमते प्रतिपादन केले की, बाब टिप्पणीत नमुद केलेल्या सर्व अटींच्या अधिन राहुन बाब टिप्पणीत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे प्रस्तावित कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत यावी.

उपरोक्त चर्चेअंती मंडळाने निर्णय घेतला की,

ठराव क्र. ७७८

राष्ट्रीय झोपडपटटी सुधार कार्यक्रमान्तर्गत औरंगाबाद येथील दोन झोपडपटटीतील १९९१ ची लोकसंख्या विचारात घेऊन रुपये १७,१७,३५१/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास बाब टिप्पणीत नमुद केलेल्या सर्व अटींच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.

स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

विषय क्र. ४:- राष्ट्रीय झोपडपटटी सुधार योजने अंतर्गत नांदेड येथील गोकुळ नगर या घोषित झोपडपटटीतील कामांच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

या बाब टिप्पणी विषयी मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, राष्ट्रीय झोपडपटटी सुधारणा कार्यक्रमान्तर्गत नांदेड महानगरपालिकेने गोकुळनगर या घोषित झोपडपटटीत मुलभुत सुविधा अंतर्गत सुविधा पुरविण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी यापुर्वी प्रस्ताव सादर केला होता. त्यास औरंगाबाद मंडळाच्या १२७ व्या बैठकीत रुपये १,३०,९४०/- एवढया रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. परंतु आयुक्त महानगरपालिका नांदेड यांनी गोकुळनगर येथील १५० मि.मी. व्यासाचे भूमिगत गटार लाईनच्या कामास रुपये १,५५,११२/- एवढी रक्कम सुधारीत अंदाजपत्रकानुसार येते व काम पुर्ण करण्यासाठी तेवढया रक्कमेची आवश्यकता असल्याने त्यास मान्यता मिळण्यास्तव विनंती केली आहे.

मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळाने असेही प्रतिपादन केले की, शासनाने ठरवुन दिलेल्या मानकाप्रमाणे भूमिगत गटारींसाठी रूपये २,०५,०००/- एवढया रक्कमेपर्यन्त प्रशासकीय मान्यता प्रदान करता येईल. यावर मा. सभापती औरगाबाद मंडळ व सर्व सदस्यांनी असे प्रतिपादन केले की, काम पुर्ण होण्यासाठी आवश्यक निधी व मानकाप्रमाणे पात्र असल्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास हरकत नाही.

याबाबत मंडळाने सर्वानुमते निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत नमुद केलेल्या सर्व अटीच्या अधिन राहुन बाब टिप्पणी सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आर्थिक तरतुदीच्या उपलब्धतेनुसार मुलभुत सुविधा पुरविण्याच्या कामांना सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत यावी.

उपरोक्त चर्चेअंती मंडळाने निर्णय घेतला की,

ठराव क्र. ७९१

राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रमान्तर्गत नांदेड येथील गोकुळनगर या घोषित झोपडपट्टयामध्ये (परिशिष्ट 'अ' प्रमाणे )व बाब टिप्पणीत नमुद केलेल्या सर्व अटी व शर्तीच्या अधिन राहुन मुलभूत सुविधा पुरविण्याच्या कामाच्या रुपये १,५५,११२/- एवढया रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.

स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

## मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांच्या परवानगीने येणारे आयत्यावेळचे विषय.

विषय क्र. : १ : उदगीर येथील अत्यल्प उत्पन्न गट या योजनेतील मागणी अभावी रिक्त असणाऱ्या गाळयांनासुरक्षा व्यवस्था पुरविणेबाबत.

या विषयाबावत मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, औरंगाबाद मंडळाने स. क्र १६४ जळकोट रोड उदगीर येथे अत्यल्प उत्पन्न याजने अंतर्गत ८० गाळे व अल्प उत्पन्नगट याजने अंतर्गत २६ गाळे तसेच दुस.या टप्पयात अत्यल्प उत्पन्न गट योजने अंतर्गत ६४ गाळे व अल्प उत्पन्न गट योजने अंतर्गत २८ गाळे हया योजना पुर्ण केलेल्या आहेत. सदरील दोन्ही टप्पयातील गाळे बांधतांना गाळयांच्या किंमतीच्या १० टक्के अनामत रक्कमेसह ठोस मागणी प्राप्त झालेली होती. तथापी १/८/२००० पासून गाळयांचे प्रत्यक्ष वाटप सुरु केल्यानंतर प्रत्यक्ष गाळे वाटपाचे वेळेस बऱ्याच अर्जदारांनी त्यांच्या अनामत रक्कमा परत घेतल्यामुळे गाळे रिक्त आहेत. त्यानंतर वारंवार जाहिरात देऊन गाळयाना प्रतिसाद मिळत नसलयामुळे प्राधिकरणाच्या प्रचलीत धोरणानुसार गाळयाच्या किंमतीच्या २० टक्के कमी करुन व अर्ज पात्रतेच्या सर्व अटी शिथील करुन प्रथम येईल त्यास प्रथम गाळा या तत्वावर जाहिरात चालु आहे व त्यास प्रतिसाद नाही. त्यामुळे सदर गाळे रिक्त असुन गाळयांचे नुकसान होत आहे.

यावर मा. सदस्य श्री. चांदपाशा इनामदार यांनी असे प्रतिपादन केले की, नांदेड येथील गाळयांच्या सुरक्षेसाठी मंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या धरतीवर प्राधिकरणाच्या ~~कार्यावर~~ मान्यतेच्या अपेक्षेने उदगीर येथील गाळयांसाठी देखील सुरक्षा व्यवस्था पुरविण्यांत यावी. यावर मंडळाचे सदस्य श्री. राजेश्वर चव्हाण यांनी असे प्रतिपादन केले की, सदर ठिकाणचेही रिक्त गाळयांसाठी सुरक्षा व्यवस्था करण्यांत यावी. त्यास मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनी सहमती दर्शविली.

याबावत मंडळाने सर्वानुमते निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत नमुद केलेली माहिती व मुख्य अधिकारी यांनी विषद केलेली माहिती विचारात घेता चर्चेअंती मंडळाने एकमताने निर्णय घेतला की,

ठराव क्र. ७९२

जळकोटरोड उदगीर येथील स.क्र १६४ या जमिनीवरील बांधण्यांत आलेल्या गाळयांपैकी रिक्त असलेल्या गाळयांना पुढील नुकसान टाळण्यासाठी योग्य ती सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात यावी व त्यास प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता घ्यावी.

विषय क्र. २ : प्राधिकरणाच्या विभागीय मंडळाकडुन भाडेपटटयावर दिल्या जाणाऱ्या भूखंडाच्या मुळ भाडेपटटयाची मुदत संपल्यानंतर भाडेपटटयातवाढ करण्यासाठी धोरण ठरविणेबाबत.

या बाव टिप्पणी विषयी माहिती मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास दिली. त्यावर मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनी असे प्रतिपादन केले की, सदर बाब धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत असल्या कारणाने व सविस्तर चर्चा करण्यास्तव सदर बाब टिप्पणी आगामी बैठकीत ठेवण्यांत यावी.

**उपरोक्त प्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर मा. सभापती यांचे परवानगीने मा. सदस्यांनी खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित केले.**

१. मा. सदस्य श्री. चॉदपाशा इनामदार यांनी असे प्रतिपादन केले की, लातूर येथील वॅम्बे योजने अंतर्गतचे प्रस्तावाबाबतचे खुलासे लवकरात लवकर म्हाडा मुंबई येथे सादर करण्यासाठी संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांना निर्देश देण्यांत यावेत. यावर मा. मुख्य अधिकरी यांनी उपअभियंता लातूर तथा शाखा अभियंता लातूर यांना याबाबतची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

२. मा. सदस्य श्री. चॉदपाशा इनामदार यांनी लातूर तालुक्यामध्ये येडी, ढोकी, बातांगळी, चिकोरडा, बाभळगांव, सलगर इत्यादी ठिकाणी राष्ट्रीय गृहनिर्माण योजना हाती घेण्याबाबत सुचविले. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता लातूर यांना सदर गावातील म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

३. मा. श्री. राजेश्वर चव्हाण यांनी असे प्रतिपादन केले की, वॅम्बे योजने अंतर्गत म्हाडास मिळणारे अभिकरण शुल्क ५ टक्के रद्द करण्यांत आले असल्याबाबत शासनाचे निर्देश प्राप्त झालेले आहेत. सध्या प्रगतीपथावर असणाऱ्या सदनिकांसाठी ५ टक्के अभिकरण शुल्क विचारात घेऊन रुपये ३८०००/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले होते. तथापी आता अभिकरण शुल्क रद्द करण्यांत आलेले असल्यामुळे उर्वरीत रुपये २०००/- एवढी रक्कम उपलब्ध करुन देण्यात यावी. कारण प्रत्यक्ष जायमोक्यानुसार सदरील सदनिकाचे बांधकाम रुपये ३८०००/- या रक्कमेमध्ये बसत नसतांनाही केवळ किंमतीच्या मर्यादेमुळे रुपये ३८०००/- या किंमतीत सदनिका बांधण्यास कंत्राटदारास सांगण्यात आलेले आहे. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, सदर बाबतीत जिल्हा गृहनिर्माण समितीमार्फत परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यास प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. त्याप्रमाणे पुढील कायर्वाहीस्तव जिल्हा गृहनिर्माण अधिकारी यांना सुचना द्यावयाचे ठरले.

४. मा. सभापती / औरंगाबाद मंडळ यांनी असे प्रतिपादन केले की, मा. ना. श्री. शिवाजीराव पाटील निलंगेकर, महसूलमंत्री यांनी ग्रामीण भागात जास्तीत जास्त गृहनिर्माण योजना घेण्याबाबत सुचना केली आहे, त्याप्रमाणे प्रस्ताव प्राधिकरणाकडे सादर करावा. यावर मा. मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, असा प्रस्ताव प्रधिकरणकडे सादर केला असून त्यास परत प्राधिकरणाकडे पाठपुरावा करण्यात येइल.

शेवटी श्री. ललीत तपासे मुख्य लेखा अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी सर्व उपस्थिताचे आभार मानुन बैठक समाप्त झाली.